‘ प्रेस नोट ’

दिनांक:- २९.१०.२०२६

सायबर फसवणुक करणाऱ्या आंतरराज्य सायबर टोळीचा पर्दाफाश करून देशभरातील एकुण २५५ गुन्हे उघडकीस आणून ६ आरोपींना अटक केलेबाबत.

.....

मुलुंड येथील एका खाजगी कंपनीतील अकाउंटंटच्या मोबाईल व्हॉटस्अपवर दिनांक ३०/०७/२०२६ रोजी अनोळखी मोबाईलधारक इसमाने DP वर कंपनी मालकाचा फोटो ठेवून व मालक असल्याचे भासवून कंपनीच्या बँक खात्यातून रु. १०,००,०००/- पाठविण्यास भाग पाडून तक्रारदार यांची आर्थिक फसवणूक केल्याने मुलुंड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ९२५/२०२६ कलम ३१८(४),३१९(२) भा.न्या.सं. सह कलम ६६(सी),(डी) माहिती व तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास पथकाने बँक व्यवहारांचे व मोबाईल क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण केले असता फसवणुकीच्या रकमेपैकी रु. ५,५०,०००/- मेरठ, उत्तरप्रदेश येथील एका बँक खात्यात जमा होऊन चेकद्वारे काढण्यात आल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तपास पथकाने मेरठ उत्तर प्रदेश येथुन ३ आरोपींना अटक केली. अटक आरोपीकडे गुन्ह्याचा अधिक तपास केला असता गाझियाबाद येथुन १ आरोपी, वडोदरा येथुन १ आरोपी व कांदिवली, मुंबई येथून १ आरोपी अशा एकुण ०६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीकडे तपास करून फसवणुकीच्या रकमेपैकी रु. ५,५०,०००/- इतकी रक्कम व गुन्ह्यात वापरलेले एकुण ५ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहे.

गुन्ह्याची व्याप्ती :- अटक आरोपीपैकी एका आरोपीचे मोबाईलमध्ये मिळालेल्या ११ बँक खात्यांचे तांत्रिक विश्लेषण केले असता त्या खात्यांवर देशातील २१ राज्यांमध्ये १८२ सायबर तक्रारी नोंद आहेत. तसेच दुसऱ्या एका अटक आरोपीकडुन ४९ बँक खात्यांची माहिती मिळाली असुन त्या खात्यावर देशभरात ७३ सायबर तक्रारी नोंद आहेत. या सर्व सायबर तक्रारीमधील आरोपीतांकडून केलेल्या सायबर फसवणुकीची एकुण रक्कम अंदाजे ७२ कोटी रुपये असल्याचे दिसून येत आहे.

गुन्हे करण्याची पध्दत:- सदर आरोपी हे टेलिग्राम ग्रुपच्या माध्यमातुन सायबर फसवणुकीसाठी बँक खाती, सिमकार्ड यांची देवाणघेवाण करत होते. बँक खातेदारांच्या मोबाईलमध्ये APK फाईल इन्स्टॉल करुन त्यांची बँक खाती सायबर फसवणुकीची रक्कम स्वीकारण्यासाठी वापरत असत. तसेच फसवणुकीची रक्कम विविध बँक खात्यांमध्ये फिरवुन ती रोख स्वरुपात काढणे, USDT (क्रिप्टो चलन) मध्ये रुपांतरित करणे असे प्रकार करीत होते.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) श्री. मनोज शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग श्री. धनंजय कुलकर्णी, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ श्री.अभयसिंह देशमुख, मा. सहायक पोलीस आयुक्त, मुलुंड विभाग श्री. सुदर्शन होनवडजकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष घाटेकर, मुलुंड पोलीस ठाणे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक सचिन आंब्रे,पोलीस उप निरीक्षक सुमित सोनवणे, पोलीस उप निरीक्षक स्वप्निल महाजन,पार्कसाईट पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक गौरव जगताप, परि. पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल हिंगे, पोलीस हवालदार किरण चव्हाण, पोलीस हवालदार सुनिल विंचु, पोलीस हवालदार अजित पाटील, पोलीस हवालदार बबन पाटील, पोलीस शिपाई संदिप कांगणे, पोलीस शिपाई विष्णू आव्हाड यांनी सदरची कामगिरी केली आहे. तपासात उत्तरप्रदेश,गुजरात व राजस्थान पोलीसांचे सहकार्य लाभले.

नागरिकांना आवाहन:-

आपले बँक खाते,ATM कार्ड, चेकबुक किंवा सिमकार्ड कमिशनच्या अमिषाने इतरांना वापरण्यास देऊ नका, तसेच अनोळखी व्यक्तीने दिलेली APK फाईल मोबाईलमध्ये इन्स्टॉल करु नका. सायबर फसवणुक झाल्यास तात्काळ १९३० या सायबर हेल्पलाईनशी संपर्क साधावा.